महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या “महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित” (महाप्रित) उपकंपनीच्या स्थापनेस मान्यता देणे व महाप्रित या कंपनीस शासन ते शासन (G to G) कामे करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -२०२२/प्र.क्र.२९/महामंडळे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० जुलै, २०२३.

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबाची आर्थिक उन्नती जलद गतीने घडवून आणण्याच्या मुख्य उद्देशाने महाराष्ट्र शासनाने "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळा" ची कंपनी कायदा अधिनियम १९५६ अन्वये दि.१० जुलै, १९७८ रोजी स्थापना केली आहे. या महामंडळामार्फत राज्य शासनाच्या अनुदान योजना, बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना व प्रशिक्षण योजना राबविण्यात येतात. तसेच वाहिनीकृत यंत्रणा म्हणून राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एनएसएफडीसी) व राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एनएसकेएफडीसी) यांच्या योजना देखील राबविण्यात येतात. यासाठी राज्य शासनाकडून तसेच केंद्र शासनाकडून महामंडळाला विविध योजनांच्या / उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

सद्या प्रचलित असलेले नवीन तंत्रज्ञान व मागासवर्गीय लोकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेता काही कार्यरत योजनांसह नवीन योजना राबविणे आवश्यक आहे. विद्यार्थी व लाभार्थी हे समाजातील इतर घटकांइतकेच सक्षम आहेत. त्यांना केवळ संधी व समानतेची आवश्यकता आहे. माहिती तंत्रज्ञान व सोशल मिडीयामुळे जीवनमान/राहणीमान यांमध्ये बदल झालेले आहेत. वरील सर्व बाबींचा विचार करुन महामंडळाच्या अधिसंघ संस्थापन समयलेख्यातील तरतूदींच्या आधारे, “महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित (महाप्रित)” या नावाची सहयोगी कंपनी, कंपनी कायदा २०१३ अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. महाप्रित कंपनी ने बदलत्या काळाची गरज, मागास व दुर्बल समाजाच्या गरजा व वाढत्या आकांक्षा तसेच, त्यांची पात्रता लक्षात घेऊन, केंद्र व राज्य शासनाच्या विविध उद्दिष्टे, योजना व उपाययोजना यांचे एकत्रीकरण (convergence) करून मागासवर्गीय समाजाच्या सर्व समावेशक (Inclusive and sustainable growth) विकासासाठी "नवयुग" योजना आखली असून सदर योजनेमुळे मागासवर्ग व वंचितांना महसूल उभारणीत मोठा सहभाग घेता येईल, ग्रामीण भागाच्या विकासामुळे शहरी सुविधांवरचा ताण कमी होईल. तसेच वंचित व मागासवर्गीयांमध्ये सुबत्ता येऊन ते मुख्य प्रवाहात येतील.

सदर बाब विचारात घेऊन सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमार्फत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये महाप्रितला सहभागी करुन घेण्याची सूचना सर्व संबंधित विभागांना देण्याचे विचाराधीन होते.

<u>शासन निर्णय</u> :-

१. “महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची उपकंपनी म्हणून महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित” (महाप्रित) या उपकंपनीच्या दिनांक १२ एप्रिल, २०२१ रोजीच्या स्थापनेस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

२. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची उपकंपनी “महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्यौगिकी मर्यादित” (महाप्रित) या उपकंपनीला शासन ते शासन (G to G) स्तरावर (राज्यातील शासकीय विभाग,निमशासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका इ.) कडून करण्यात येणारी विविध प्रकारची कामे घेताना / कामे करताना / वा स्वीकारण्यापुर्वी शासनाचे प्रचलित नियम/कायदा/ धोरण/ आदेश यांचा महाप्रितने कसोशीने अवलंब करावा.

अ) त्याचप्रमाणे शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही वा शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ब) तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: शासाऊ १०.१२/प्र.क्र.२८/ सा.ऊ.मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक ८ जानेवारी, २०१४ मधील तरतुदीचे पालन महाप्रितने करणे बंधनकारक राहील.

३. निबंधक, कंपनी कायदा यांच्या मान्यतेप्रमाणे, महाप्रित कंपनीला महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची सहयोगी कंपनी म्हणून मान्यता देणे तसेच महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (MPBCDC) आणि महाप्रित यांना त्यांच्या अधिसंघ संस्थापन समयलेख (MoA) आणि / किंवा संस्थापन नियमावली (AoA) नुसार त्यांची उद्दिष्टे साध्य करण्याची / आवश्यक ते काम करण्याची शासनमान्यतेने महाप्रितने कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (MPBCDC) आणि महाप्रीतला त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे तसेच भारत सरकारचे अंगीकृत उपक्रम (PSU), स्थानिक स्वराज्य संस्था / महानगरपालिका (ULB) यांच्या सोबत SPV/ उपकंपन्या स्थापन करणे, संयुक्त उपक्रम स्थापन करणे, कौशल्य केंद्रे (Center of Excellences and Incubation Center) इत्यादीसाठी महाप्रित या कंपनीने वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: : शासाऊ १०.१२/प्र.क्र.२८/सा.ऊ.मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक ८ जानेवारी, २०१४ मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक राहील.

५. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (MPBCDC) आणि महाप्रितला त्यांच्या अधिसंघ संस्थापन समयलेख व संस्थापन नियमावली मधील (MOA and AOA) तरतुदीनुसार, शासनावर दायित्व न ठेवता महाप्रितला आवश्यकतेनुसार स्वबळावर निधी उभारता येईल. तथापि निधीची उभारणी करताना वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: : शासाऊ १०.१२/प्र.क्र.२८/सा.ऊ.मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ८ जानेवारी ,२०१४ मधील तरतूदींप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक राहील.

६. सदर कंपनीचे कामकाज करतांना वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक शासाऊ १०.१२/ प्र.क्र.२८/ साऊ. दि.०८.०१.२०१४ तसेच आवश्यकतेनुसार इतर संबंधीत प्रचलित अथवा वेळोवेळी निर्गमित होणारे शासनाचे कायदा/ नियम/धोरण आदेश यातील तरतूदींचे पालन करणे सदर कंपनीवर बंधनकारक राहील.

(७) या शासन निर्णयामध्ये नमुद प्रकल्प अथवा कामकाजाचे स्वरूप शासनाच्या अनेक विभागांशी संबंधित असल्याने त्या संदर्भातील कामकाजाबाबत महाप्रितने संबंधीत विभागांची सहमती तसेच सक्षम प्राधिका-यांच्या स्तरावर मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांबाबतही या प्रमाणेच कार्यवाही करून शासन निर्णय क्र.शासाऊ १०.१२/प्र.क्र.२८/सा.ऊ., वित्त विभाग, मंत्रालय,दि.०८.०१.२०१४ मधील तरतूदींचेही पालन करणे महाप्रित कंपनीस अनिवार्य राहील.

८. या आदेशानंतर महाप्रित या उपकंपनीकरिता उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेने पदनिर्मितीसाठी व अनुषंगिक बाबीसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्याबाबचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

९. महाप्रित कडून राबविण्यात येणारे प्रकल्प / कामाचे स्वरूप खालील प्रमाणे आहे:

१. अक्षय ऊर्जा आणि इलेक्ट्रिक चार्जिंग केंद्र व वाहने
२. कृषी प्रक्रिया मुल्य साखळी आणि जैवइंधन
३. पायाभुत सुविधा प्रकल्प, एसटीपी आणि डेटा सेंटर
४. ऊर्जा कार्यक्षमता, ऑडिट आणि ESCO प्रकल्प
५. परवडणारी घरे आणि शहरी नियोजन
६. महिला उद्योजकता आणि अभिसरण
७. पर्यावरण आणि हवामान बदल
८. आरोग्य, उद्योन्मुख जीवन जैव विज्ञान आणि निरोगीपणाचा प्रचार करणे (मदत)
९. उद्योन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रे आणि भविष्यवादी ऊर्जा एकत्रीकरण
१०. कॉर्पोरेट समुदाय विकास आणि CSR.

उपरोक्त प्रकल्प महाप्रितने राबविताना वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: शासाऊ १०.१२/ प्र.क्र.२८/सा.उ.मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ८ जानेवारी, २०१४ मधील तरतूदींचे पालन करणे आवश्यक राहील. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाने दि.१९.०४.२०२३ रोजी दिलेल्या मान्यतेस अनुसरून वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारीक संदर्भ क्र.- ४७/२०२३/सा.उ, दि.१४.०६.२०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०७१०१८५१०६०७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SOMNATH NAMDEO BAGUL
Date: 2023.07.10 18:54:18 +05'30'

(सो. ना. बागुल)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(२) मा. सभापती, यांचे सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(३) मा. अध्यक्ष, यांचे सचिव, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(४) मा. उपसभापती, यांचे सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(५) मा. उपाध्यक्ष, यांचे सचिव, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(६) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
(७) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
(८) मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई.
(९) मा. विरोधी पक्ष नेता, यांचे खाजगी सचिव, विधानसभा/विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
(१०) मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई.
(११) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय , मुंबई.

(१२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

(१३) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मर्या., मुंबई.

(१४) मा.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपुर.

(१५) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(१६) निवड नस्ती- (महामंडळे कार्यासन).